(१)

# महाराष्ट्र शासन
## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
## नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा माळा, ५, बी.जे.रोड, पुणे-४११ ००१.

**दुरध्वनी क्र. ०२०- २६१२२८४६/४७** ईमेल :- comm_audit@rediffmail.com

जा.क्र. सआ.-१९/ लेप.-३/फेरलेप.,चा.लेप.सुचना/ ६२० /२०२३, दिनांक -१९/०६/२०२३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण (Test audit) / फेरलेखापरीक्षण (Re-audit) प्रस्ताव सादर करणे व आदेश निर्गमीत करताना घ्यावयाच्या दक्षतांबाबत.**

## परिपत्रक

**वाचावे** :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.लेप/कक्ष १७/लेप/फेर.लेप.प्रस्ताव/दक्षता/२४४/ सन ०९, दिनांक १५/०३/२०१०.

२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. सआ/लेप/परिपत्रक/फेरलेप आदेश कालावधी/ १३३०/२०१५, दिनांक १४/१२/२०१५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत कलम ८१(१)(अ) नुसार वैधानिक लेखापरीक्षकाने सादर केलेल्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालात संस्थेच्या लेख्यांचे खरे व अचूक चित्र उघडकीस आणले नाही असे निबंधकाच्या निदर्शनास आणून दिल्यास, निबंधकास किंवा प्राधिकृत व्यक्तीस अशा सहकारी संस्थेचे कलम ८१(३)(क) नुसार चाचणी लेखापरीक्षण करता येईल किंवा करवुन घेता येईल. तसेच कलम ८१(६) अन्वये निबंधकास, संस्थेच्या अर्जावरुन किंवा अन्यथा संस्थेच्या कोणत्याही लेख्यांची पुन्हा लेखापरीक्षा करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे असे आढळून आल्यास, त्यास आदेशाद्वारे फेर लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करता येईल अशी तरतूद आहे.

९७ व्या घटनादुरूस्तीच्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम ८१ आणि कलम ७५ मधील तरतुदी विचारात घेता सहकारी संस्थांना वैधानिक लेखापरीक्षक नियुक्त करण्याची स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे. संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार, संस्था यांचेकडून मूळ वैधानिक लेखापरीक्षणाबाबत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जामध्ये सहकारी संस्थांच्या चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाची संबंधितांची मागणी विचारात घेता, निबंधकांना चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारीत करताना प्राप्त प्रस्तावाची पार्श्वभूमी व त्याबाबतची कारणमिमांसा यामध्ये समानता व सुसुत्रता राखणे आवश्यक आहे.

वरील वाचावे परिपत्रक दि.१५/०३/२०१० व १४/१२/२०१५ अन्वये फेरलेखापरीक्षण करणेबाबत सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. असे असले तरीही सदर सुचनांच्या अनुषंगाने चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणा बाबत काही अधिकच्या बाबी स्पष्ट करणे आवश्यक झालेले आहे. तद्नुषंगाने परिपत्रक दि.१५/०३/२०१० व १४/१२/२०१५ मधील सुचना खालील कारणास्तव अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

१) चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाचे प्रस्ताव निबंधकांकडे सादर करताना प्रामुख्याने सर्वंकष सुचना निर्गमीत करणे आवश्यक आहे.

२) चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करताना प्रामुख्याने संबंधीत आदेशात समाविष्ट करावयाच्या अधिकच्या बाबी स्पष्ट करणे आवश्यक आहे.

३) चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करताना जी पार्श्वभूमी व कारणे विचारात घेणे आवश्यक आहे अशा बाबी अधिक स्पष्ट करणे गरजेचे झाले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता राज्यातील सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणा बाबत खालीलप्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत.

**अ) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे प्रस्ताव सक्षम निबंधकांकडे सादर करताना प्रामुख्याने खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.**

१) संबंधीत संस्थेचे संबंधीत कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्यात यावी.

२) ज्या कारणांमुळे व आक्षेपांमुळे संबंधीत संस्थेचे सदर कालावधीचे चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण करणे आवश्यक आहे, अशा कारणांचा/मुद्यांचा समावेश मुळ लेखापरीक्षण अहवालात करण्यात आला आहे किंवा नाही याबाबत सर्वप्रथम खात्री करण्यात यावी. याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या खालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदी विचारात घेण्यात याव्यात.

३) प्राप्त तक्रार अर्जाचे अनुषंगाने मुळ लेखापरीक्षण अहवालाची छाननी करण्यात यावी. छाननी अंती तक्रार अर्जातील मुद्यांचे निराकरण झालेले आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यात यावी.

४) संस्थेचे संबंधीत कालावधींचे मुळ लेखापरीक्षण केलेल्या लेखापरीक्षकाचे नाव, पदनाम व नामतालिका क्रमांक तसेच लेखापरीक्षण कालावधी दर्शविण्यात यावा.

५) फेरलेखापरीक्षण करावयाचा कालावधी दर्शविण्यात यावा.

६) चाचणी लेखापरीक्षण संदर्भात संबंधित मुद्दे व कालावधी स्पष्ट करण्यात यावा.

७) चाचणी किंवा फेर लेखापरीक्षणाची मागणी करणारे सभासद, संस्था, तक्रारकर्ते यांचे नावासह तपशील देण्यात यावा.

८) निबंधकास फेरलेखापरीक्षण करण्याची गरज वाटल्यास अन्यथा तशी खात्री झाल्यास ज्या कारणांमुळे / मुद्यांमुळे संस्थेचे फेरलेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक वाटते अशा प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या खालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार चाचणी लेखापरीक्षण, फिरते पथक तपासणी,

(५)

सहकारी बँकांचे बाबतीत विशेष लेखापरीक्षण इ. पर्यायाचा सर्वप्रथम विचार करण्यात यावा. जेणेकरुन कमी कालावधीमध्ये सदरचे लेखापरीक्षण पूर्ण होऊ शकेल.

९) ज्या कारणांमुळे, मुद्यांमुळे वा आक्षेपामुळे चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. अशा कारणांचा/ मुद्यांचा सविस्तर तपशील आवश्यक शिफारशींसह प्रस्तावात सादर करण्यात यावा.

१०) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाची मागणी करणारे अर्जदार चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण शुल्क भरण्यास तयार आहे किंवा कसे ? याबाबत तपशील देण्यात यावा.

११) सदरचे प्रस्ताव सादर करण्यापुर्वी संबंधित संस्थेचे, तक्रारदाराचे व मुळ लेखापरीक्षकाचे म्हणणे बाबत निबंधकांनी खुलासा प्राप्त करुन घ्यावा. जेणेकरुन अशाप्रकारचे आदेश निर्गमीत करण्यापुर्वी नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन होईल तसेच सर्व संबधीतांना त्याचे म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध होईल. लेखापरीक्षक नियुक्तीचे बोलके आदेश पारित करण्यात यावेत.

१२) उपरोक्त सुचना व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार आवश्यक अभिप्राय व स्पष्ट शिफारशींसह प्रस्ताव संबंधित निबंधक कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर पत्राची प्रत संबंधीत तक्रारदार/अर्जदार सभासदांस सुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी.

**ब) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करताना खालील प्रमाणे नमुद पार्श्वभूमी व कारणे विचारात घेणेत यावीत.**

१) मूळ वैधानिक लेखापरीक्षण व्यवस्थितपणे पार पाडले गेले नसल्याचे अथवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार तसेच वेळोवेळी निबंधकांनी निर्गमीत केलेल्या परिपत्रकीय सुचना व निर्देशांचे पालन करुन पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आणून दिल्यास;

२) लेखापरीक्षकाने आपल्या मूळ लेखापरीक्षणावेळी काही बाबी अनावधानाने किंवा हेतूपुरस्सर तपासण्याचे टाळले असल्याचे निदर्शनास आल्यास;

३) संस्थेने मागणी केल्यास अथवा संस्थेच्या कोणत्याही लेख्याची चाचणी लेखापरीक्षण / फेरलेखापरीक्षण करणे आवश्यक आहे, अशी निबंधकाची खात्री झाल्यास,

वरील प्रमाणे नमुद परिच्छेद 'ब' मधील अ. क्र. १ ते ३ अन्वये नमूद पार्श्वभूमी व कारणे विचारात घेवून संबंधीत सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करावेत.

**क) चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करताना सदर आदेशामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश करण्यात यावा.**

१) चाचणी लेखापरीक्षणा संबंधीत मुद्दे व संबंधीत कालावधी.

२) फेरलेखापरीक्षणाबाबत संबंधीत कालावधी.

३) संस्थेच्या/अर्जदार सभासदाच्या मागणीनुसार चाचणी/फेरलेखापरीक्षण करावयाचे असल्यास सदरचे लेखापरीक्षण शुल्क कोणाकडून वसूल करावयाचे आहे, याबाबत आदेशात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. असे लेखापरीक्षण शुल्क संबंधित संस्था/अर्जदार सभासद भरण्यास तयार असल्याची संबंधित निबंधकांनी आदेश पारीत करण्यापुर्वी खात्री करावी.

४) याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ७४ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रमाणे निर्गमीत आदेशामध्ये लेखापरीक्षण शुल्क वसूल करुन घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख नसल्यास, अशा प्रकरणी सदरचे आदेश संबंधीत निबंधकांनी स्वत: होऊन (Sue moto) काढले असल्याचे समजून, संबंधीत लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण शुल्क वसूल करुन घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

५) फेरलेखापरीक्षण संदर्भात सदर लेखापरीक्षण शुल्क संबंधीत निबंधकांचे बँक खात्यात भरणा करुन घेण्यात यावे. सदरचे फेरलेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ७४ मधील तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६) चाचणी लेखापरीक्षण आदेशातील मुद्यांचा व कालावधीचा विचार करुन, महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४स,दि.२९.१०.२०१४ मधील तरतुदीनुसार चाचणी लेखापरीक्षण शुल्क संबंधीत निबंधकांनी निर्धारीत करण्यात येऊन, सदरचे शुल्क शासकीय कोषागारात भरणा करुन घेण्यात यावे. जेणेकरुन लेखापरीक्षण पूर्ण करण्यास विलंब होणार नाही.

७) मुळ लेखापरीक्षण केलेल्या लेखापरीक्षकास त्याचे वरिष्ठ असलेल्या संवर्गातील लेखापरीक्षकाचे नावाची शिफारस जिल्हा विशेष लेखापरीक्षक कार्यालयाशी समन्वय साधून चाचणी लेखापरीक्षण/फेरलेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था यांनी, उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करुन सदरचे लेखापरीक्षणा करिता लेखापरीक्षकाचे नाव सुचविणेची कार्यवाही करावी.

८) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था यांनी वेळोवेळी सदरचे कामकाजाकरीता लेखापरीक्षकांचे नावांची शिफारस करताना आपले अधिनस्त सर्व लेखापरीक्षकांकडील संपूर्ण कामाचा व्याप व त्याचेकडील प्रलंबीत लेखापरीक्षण कामकाज लक्षात घेवूनच, लेखापरीक्षकांची नावे संबंधीत निबंधकाकडे प्रस्तावित करण्यात यावीत. एकाच लेखापरीक्षकाकडे जास्तीचे लेखापरीक्षणाचे वाटप होणार नाही, याची प्राधान्याने दक्षता घेणेत यावी. तसेच लेखापरीक्षण कामकाजाचे समसमान वाटप होईल असे पहावे. जेणे करुन संबंधित संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण / फेरलेखापरीक्षण वेळीच पूर्ण होईल.

९) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण मागणी संदर्भात प्राप्त तक्रार अर्जाची प्रत संबंधित आदेशित लेखापरीक्षकांना द्यावयाच्या आदेशाच्या प्रती सोबत उपलब्ध करून देण्यात यावी.

१०) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे आदेश असलेल्या लेखापरीक्षकाची बदली, पदोन्नती, सेवावर्ग, इ. झाली तरीही सदरचे लेखापरीक्षण मुळ आदेशीत असलेल्या लेखापरीक्षकाकडूनच पूर्ण करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. काही अपवादात्मक कारणांमुळे चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे मुळ आदेशात बदल करावयाचा झाल्यास, सदरची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. याबाबत सर्व जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था यांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.

(९)

११) चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण आदेशात कोणत्याही प्रकारची संदिग्धता राहणार नाही. तसेच आदेश सुस्पष्ट असावेत याची दक्षता घेणेत यावी. जेणेकरुन आदेशात बदल करणे इ. कारणांमुळे लेखापरीक्षण पूर्ण होण्यास विलंब होणार नाही.

१२) निबंधकांनी चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षण आदेशाच्या प्रती निर्गमित होताच संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ व संबंधित लेखापरीक्षक यांच्या आदेशाच्या प्रती संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था यांचे कार्यालयास विनाविलंब प्राप्त होतील असे पहावे. संबंधित जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था यांनी प्राप्त आदेशाच्या प्रती संबंधित लेखापरीक्षकास वेळीच प्राप्त होतील याची खात्री करावी. तसेच संबंधित आदेशाच्या प्रती संबंधित संस्था/ अर्जदार यांनाही वेळीच प्राप्त होतील याची खात्री संबंधित निबंधकाने करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा कालापव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७४ मधील तरतुदीनुसार संबंधितांना पुरेशी संधी देवून सुध्दा लेखापरीक्षण शुल्क निर्धारीत मुदतीत भरणा केले नसल्यास, तक्रार अर्जातील मुद्यांचा गुणवत्तेवर सर्वंकष विचार करुनच संबंधीत संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण / फेरलेखापरीक्षण करावयाचे की नाही याबाबत संबंधीत निबंधकाने निर्णय घ्यावा. अन्यथा सदरचे आदेश रद्द करण्याचे दृष्टीने तसा प्रस्ताव आपले पेक्षा वरीष्ठ संबंधीत निबंधकाकडे सादर करावा. वरीष्ठ संबंधीत निबंधकांनी सदरचा आदेश कारणपरत्वे तपासुन तात्काळ रद्द करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच आदेश रद्द करण्यात आल्याबाबत संबंधितांना वेळीच कळविण्यात यावे. आदेश रद्द केलेली सहकारी संस्था संबंधीत संस्थांच्या अहवाल आकडेवारी व यादीतून कमी करण्यात यावी. जेणेकरुन नेमकी प्रलंबित संस्थांची स्थिती व संख्या स्पष्ट होईल.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ खालील चौकशी आदेश पारित करताना लेखापरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या, निरीक्षणाच्या किंवा समापनाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी पाच वर्षांच्या कालावधीत घडलेल्या आर्थिक नुकसानीस पुरक दोषी व्यक्तींवर जबाबदारी निश्चितीची तरतूद आहे. सदरची तरतूद लक्षात घेता फेरलेखापरीक्षणा बाबत देखील गत पाच वर्षापर्यंत कालावधी विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या परिपत्रकीय सूचनांप्रमाणे फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करणेसाठी फेरलेखापरीक्षणाचा कालावधी मूळ लेखापरीक्षण अहवालाप्रमाणे अंतिम आर्थिक वर्षाच्या कालावधीपासून मागील पाच वर्षापर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे. पाच वर्षावरील मूळ लेखापरीक्षणाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास फेरलेखापरीक्षणा ऐवजी केवळ मुद्दे व कालावधी निश्चित करून कलम ८१(३)(क) मधील तरतुदीनुसार चाचणी लेखापरीक्षणाचे आदेश पारित करण्यात यावेत.

उपरोक्त सुचनांचे पालन करुनच यापुढे सहकारी संस्थांच्या चाचणी लेखापरीक्षण / फेरलेखापरीक्षणाचे परिपूर्ण प्रस्ताव संबंधित निबंधक कार्यालयास सादर करण्यात यावेत. तसेच संबंधित निबंधकांनी चाचणी लेखापरीक्षण/ फेरलेखापरीक्षणाचे आदेश पारित करण्यापूर्वी व आदेश पारित करताना उपरोक्त सुचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी. सदर सुचनांचे उल्लंघन करणारे संबंधीत अधिकारी उचित कारवाईस पात्र राहतील याची नोंद घेऊन, संबंधितांविरुध्द आवश्यक कारवाई करणेबाबतचे प्रस्ताव

सादर करावेत. सदरच्या सुचना सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांनी आपले अधिनस्त सर्व कार्यालयांच्या (सर्व योजनांसह) निदर्शनास आणून सदर सुचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी.

(अनिल कवडे )
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत, माहिती व उचित कार्यवाहीस्तव :-**

१) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य तथा विशेष निबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर,पुणे-५.
२) आयुक्त, वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) आयुक्त, दुग्ध विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी दुध डेअरी, वरळी, मुंबई.
४) आयुक्त, मत्स्य व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन, मुंबई.
५) आयुक्त, आदिवासी विकास व निबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
६) पणन संचालक, कृषी पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) विशेष कार्य अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ (पदुम), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) अपर निबंधक (आदिवासी विकास), सहकारी संस्था, नाशिक.
१४) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
१५) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), (सर्व).
१६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
१७) जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, (सर्व).
१८) कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्तालय, पुणे (सर्व).
१९) मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.
२०) निवड नस्ती.